वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# धनंजय मुंडे राजीनामा देणार?

Email:- dailydivyawarta@Gmail.com

दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com



## अजितदादांच्या भेटीनंतर घडामोडींना वेग

मुंबई, (दिव्य न्युज):- बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आली. हे प्रकरण आता चांगलंच तापलं आहे. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची देखील मागणी होत आहे. जोपर्यंत संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळत नाही, तोपर्यंत धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी होत आहे. या प्रकरणात आज सर्व पक्षीय नेत्यांनी राज्यपालांची भेट घेतली. धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी राज्यपालांकडे सर्वपक्षीय नेत्यांकडून करण्यात आली आहे. या प्रकरणात दबाव वाढत आहे.

दरम्यान मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे मंत्री धनंजय मुंडे हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीसाठी पोहोचले आहेत. धनंजय मुंडे हे अजितदादांच्या मंत्रालयातील दालनात त्यांच्या भेटीसाठी पोहोचले आहेत. दोन्ही नेत्यांमध्ये गेल्या १५ मिनिटांपासून चर्चा सुरू आहे. अजित पवार आता या प्रकरणात नेमका काय निर्णय घेणार? दोन्ही नेत्यांमध्ये काय चर्चा सुरू आहे? याकडे आता संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे.

## सुरेश धस यांची आक्रमक भूमिका

भाजप आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणात सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांच्याकडून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. एवढंच नाही तर अजित पवार हे धनंजय मुंडे यांना पाठिशी घालत आहेत, असा आरोपही यावेळी सुरेश धस यांनी केला आहे. त्यामुळे आता हे प्रकरण आणखी तापण्याची शक्यता आहे.

## सर्वपक्षीय नेत्यांनी घेतली राज्यपालांची भेट

दरम्यान आज सर्वपक्षीय नेत्यांकडून आज राज्यपालांची भेट घेण्यात आली. धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यात यावा अशी मागणी त्यांनी राज्यपालांकडे केली. या प्रकरणात आपण लक्ष घालू असं आश्वासन देखील यावर राज्यपालांकडून देण्यात आलं आहे. आता उद्या सर्वजण मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेणार आहोत अशी माहिती आमदार सुरेश धस यांनी दिली आहे. त्यानंतर आता धनंजय मुंडे हे अजित पवार यांच्या भेटीसाठी पोहोचले आहेत.

# सीआयडीच्या मोठ्या हालचाली, वाल्मिक कराडच्या अडचणीत वाढ होणार?

बीड , (दिव्य न्युज):- मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण प्रचंड चर्चेत आहे. कारण या हत्या प्रकरणात नवनवीन खुलासे समोर येत आहेत. अशातच या हत्या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मिक कराड, मुख्य आरोपी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे यांच्यासह इतर आरोपींवर याआधी देखील अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. त्यामुळे या आरोपींवर मोक्का लावण्याची मागणी होत आहे.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींनी एकत्रितपणे कट रचुन देशमुख यांची हत्या केली आहे. त्यामुळे आता सीआयडीकडून या टोळीवर मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. त्यामुळे आता वाल्मिक कराडच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

या कायद्यानुसार, खून, खंडणी, अमली पदार्थाची तस्करी, सुपारी देणे, हप्ता, खंडणीसाठी अपहरण असे संघटित गुन्हे करणाऱ्या टोळ्यांवर मोक्का लावला जातो. तसेच जर गुन्हेगारी पार्श्वभूमी तयार करणाऱ्या आरोपीला पोलीसांकडून प्रथम समज देखील दिली जाते. मात्र या गोष्टीचा आरोपीने गैरफायदा घेतला तर तो पोलिसांच्या रेकॉर्डवर येतो. त्यानंतर अशा

▶▶ पान २ वर

# संतोष देशमुख यांच्या हत्येचं 3333 कनेक्शन

## याच नावाने होती गँग, गावासह तालुक्यात होती दहशत

बीड , (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली, या घटनेनं राज्यभरात खळबळ उडाली होती. आता हे प्रकरण चांगलंच तापलं आहे. पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत सहा जणांना अटक केली आहे, मात्र एक जण अद्यापही फरार आहे. संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, या मागणीसाठी आता राज्यभरात आक्रोश मोर्चे काढले जात आहेत. या मोर्चामध्ये सर्वपक्षीय नेत्यांसोबतच सामान्य नागरिक देखील मोठ्या संख्येनं सहभागी होत आहेत.

सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. त्यानंतर काही दिवसांमध्येच पोलिसांनी या प्रकरणातील चार आरोपी जयराम चाटे,

▶▶ पान २ वर

## वाल्मिक कराडशी खास कनेक्शन

# एसआयटी पथकातून तीन पोलिसांची उचलबांगडी





बीड, (दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापलं आहे. देशमुख यांचं अपहरण झाल्यापासून पोलिसांनी आपल्या कर्तव्यात कुचराई केल्याचा आरोप होत आहे. यामुळे अलीकडेच बीडचे तत्कालीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदली करण्यात आली होती. त्यांच्या जागी नवनीत कावत यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर बीड पोलीस दलातील इतरही चार पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. पोलीस दलातील या उलथापालथीनंतर आता एसआयटी पथकातील एका अधिकाऱ्यासह दोन पोलीस कर्मचाऱ्यांची उचलबांगडी करण्यात आली आहे.

खंडणीच्या गुन्ह्यात अटक असलेला आरोपी वाल्मिक कराड याच्यासोबत एसआयटीतील स्थानिक गुन्हे शाखेतील एका अधिकाऱ्याचा फोटो व्हायरल झाला. यामुळे खासदारांसह आमदारांनी यावर आक्षेप नोंदविला. याची माहिती शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी रविवारी 'एक्स' समाजमाध्यमाद्वारे दिली होती. त्यामुळे आता या एका अधिकाऱ्यासह दोन कर्मचारी एसआयटीमध्ये तपासाचे काम करणार

▶▶ पान २ वर

# धनंजय मुंडेसाठी राष्ट्रवादी आक्रमक, आ.सुरेश धसांवर गंभीर आरोप

बीड , (दिव्य न्युज):- संतोष देशमुख हत्या प्रकरणावरुन आ. सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोपांच्या फैरी झाडल्या नंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस देखील आक्रमक झाली आहे. राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अविनाश नाईकवाडे यांनी पत्रकार परिषदेतून आ. सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप केले असून सुरेश धसांनी या आरोपांची उत्तरे द्यावीत असे म्हटले आहे.

अविनाश नाईकवाडे यांनी पत्रकार परिषदेतून काही लोकप्रतिनिधी जिल्ह्याची बदनामी करित असल्याचे सांगितले. आम्ही इतके दिवस शांत होतो, पण आता किती सहन करणार? मंत्री धनंजय मुंडेंचे नेतृत्व संपवु पाहणारे आ. सुरेश धस



कोण आहेत? बुझ्या गायकवाड हत्या प्रकरणातील आरोपी संजय तांबडे वापरत असलेला मोबाईल क्रमांक गायकवाड हत्या प्रकरणाच्या काही दिवस अगोदर सुरेश धस वापरत होते. आबासाहेब विक्रम धस (आरोपी ११) याच्याकडून ३ लाख जप्त करण्यात आले होते, त्या आरोपीचे आणि धसांचे संभाषण झाले होते, या संबंधावर आ. सुरेश धस काय

▶▶ पान २ वर

## पोलीस प्रशासनाने पीआय गणेश मुंडेंचीच चड्डे खेचली,थेट पुण्याला पाठवले

बीड, (दिव्य न्यूज):- मी जर प्रेस घेतली तर बीडच्या खासदाराची चड्डी राहणार नाही', असं म्हणत खा. बजरंग सोनवणे यांच्याबाबत पोलीस-पत्रकारांच्या व्हॉटसअॅप ग्रुपवर वादग्रस्त पोस्ट टाकणाऱ्या महामार्ग पोलीस निरीक्षक गणेश मुंडेचीच पोलीस प्रशासनाने चड्डी खेचत त्यांची थेट पुण्यात बदली केली आहे.



मी जर पत्रकार परिषद घेतली तर खासदाराची चड्डी सुद्धा जागेवर राहणार नाही अशी पोस्ट गणेश मुंडे यांनी एका ग्रुपवर केली होती. त्यानंतर त्यांना ग्रुपमधून काढून टाकण्यात आलं. खा. बजरंग सोनावणे यांच्याबद्दल वादग्रस्त पोस्ट केल्यानंतर संपूर्ण राज्यभरातून या पोलीस अधिकाऱ्यावर रोष व्यक्त करण्यात येत होता. दरम्यान, आता राज्य सरकारने गणेश मुंडे यांचीच चड्डी खेचत बीड जिल्ह्यातून त्यांना हटवले असून त्यांची थेट पुणे येथील नियंत्रण कक्षात बदली केली आहे.

## कैलास फड सह इतर दोघांचे पिस्तुलचे लायसन रद्द

बीड, (दिव्य न्युज):- पिस्टल दाखवून त्याचा व्हिडीओ व्हायरल करणाऱ्या कैलास फडसह इतर दोघांना जिल्हा प्रशासनाने चांगलाच दणका दिला आहे. कैलास फड सह इतर दोघांचेही पिस्टलचे लायसन रद्द करण्यात आले आहे. दरम्यान व्हिडीओ व्हायरल केल्या प्रकरणी या प्रकरणात कैलास फड याच्या विरुद्ध गुन्हा दाखल होऊन



त्याला अटक देखील झाली होती. बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. जिल्ह्यामध्ये कोणालाही पिस्टलचे परवाने दिल्याची बाब अनेकांनी बोलून दाखविल्यानंतर या

पान २ वर

# १६ लाखांत बना तलाठी, आमिष देणाऱ्या अभियंत्यांवर गुन्हा

## शिरूरमध्ये गुन्हा दाखल : अॅडव्हान्स म्हणून घेतले ६ लाख, विचारणा करताच उडवाउडवीची उत्तरे

इन डेप्थ स्टोरी

बीड : १६ लाख रुपयांत तलाठी पदाची नोकरी मिळवून देतो, असे आमिष दाखवून अॅडव्हान्समध्ये ६ लाख रुपये घेऊन सुशिक्षित बेरोजगार तरुणास फसविल्याचा प्रकार शनिवारी उघडकीस आला. ज्याने आमिष दिले तो गेवराई पंचायत समितीमध्ये बांधकाम विभागात स्थापत्य अभियंता सहायक पदावर कार्यरत असून, अशोक श्रीकिसन वाघमोडे असे त्याचे नाव आहे.



अशोक वाघमोडे

पाडळी (ता. शिरुर कासार) येथील सुशिक्षित बेरोजगार तरुण ऋषिकेश रवींद्र राऊत हा विज्ञान शाखेतून पदवीधर असून, तो स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी बीडमध्ये राहत होता. जानेवारी २०२३ मध्ये त्याची अभ्यासिकेत गेवराई पंचायत समितीत बांधकाम विभागात स्थापत्य अभियंता सहायक अशोक वाघमोडे याच्यासोबत ओळख झाली. एकमेकांनी परिचय दिल्यानंतर त्यांच्या ओळख वाढत गेली. वारंवार भेटी होत गेल्याने वाघमोडे यांच्या बोलण्यावर ऋषिकेशचा विश्वास बसू लागला. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात वाघमोडे याने ऋषिकेशला, जून महिन्यात तलाठी पदासाठी जागा निघणार आहे. परीक्षेत माझी लिंक असून, तुला पास करून देतो. त्यासाठी १६ लाख रुपये लागतील, असे सांगितले. काही दिवसांनी जूनमध्ये तलाठी पदासाठी जागा निघणार असल्याची माहिती अभ्यासिकेतून मिळू लागली. वाघमोडे याची माहिती खरी असल्याचा विश्वास बसला.

### जूनमध्ये ६ लाख दिले

- गेवराई पंचायत समितीमध्ये स्थापत्य अभियंता सहायक अशोक वाघमोडे यांनी सांगितले की, तलाठीपदाची परीक्षा ही टीसीएस कंपनीमार्फत घेतली जाते व त्या कंपनीत माझा मेव्हणा मोठ्या पदावर आहे. मी सरकारी नोकर आहे, मी नोकरी सोडून पळून जाणार नाही.
- यावर विश्वास ठेवून ऋषिकेश राऊत याने १८ व १९ जून असे दोन दिवसांत ६ लाख रुपये अॅडव्हान्स अशोक वाघमोडे यांच्या खात्यावर आरटीजीएस केले.



### २६ जूनला आली ४,६४४ तलाठी पदांसाठी जाहिरात

- अशोक वाघमोडेने म्हटल्याप्रमाणे जून महिन्यात २६ तारखेला ४६४४ तलाठी पदासाठी जाहिरात आली.
- ऋषिकेश राऊत यास रायगड जिल्हा तलाठी पदासाठी अर्ज भरण्यास सांगितले.
- परीक्षा केंद्र बीड, छत्रपती संभाजीनगर, पुणे असे मागितले. अंबाजोगाईला परीक्षा झाली.

### निवड यादीत नावच नाही

परीक्षा झाल्यानंतर काही दिवसांनी तलाठी पदासाठी निवडून आलेल्यांची यादी प्रसिद्ध झाली. त्यात ऋषिकेशचे नाव नव्हते. ऋषिकेशने अशोक वाघमोडे याला फोन करून विचारले असता अंतिम यादी येणे आहे असे म्हणून टाळले. त्यानंतर वारंवार फोन करूनही अशोक वाघमोडे याच्याकडून उडवाउडवीची उत्तरे देण्यात येऊ लागली. शेवटी ऋषिकेशला सहा लाखाला नोकरीचे आमिष दाखवून आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. यावरून ऋषिकेशने दिलेल्या तक्रारीवरुन शिरुर कासार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक डी.आर. कुलकर्णी करीत आहेत.





# न्यायालयातील केस मिटवण्यासाठी मागितली खंडणी

## सात जणांविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल

अंबाजोगाई , (दिव्य न्युज):-न्यायलयात सुरू असलेली केस मिटवण्यासाठी दहा ते पंधरा लाख रुपये खंडणी दे अन्यथा जीव मारून टाकू अशी धमकी दिल्या प्रकरणी येथील शहर पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

शहरातील मोहमद्दीया वसाहतीत राहणारे शिक्षक मुजोबोद्दीन हमीदोद्दीन काझी (वय ५७) यांच्याविरुद्ध त्यांच्या पत्नीने केस केली असून ही केस न्यायालयात सुरू आहे. ही केस मिटवायची असेल तर दहा ते पंधरा लाख रुपयांची खंडणी दे अन्यथा जिवे मारून टाकू अशी धमकी आरोपींनी त्यांना बडा हनुमान मंदिराच्या जवळ असलेल्या तलावा च्या परिसरात दिली. या प्रकरणी शिक्षक मुजोबोद्दीन काझी यांच्या फिर्यादीवरून मुक्तार सत्तार पटेल, अनवर मिस्कीन, सलाम मुक्तार पटेल, मुखीद मुक्तार पटेल, सय्यद असलम, सय्यद अक्रम, इम्रान खान (सर्व रा. परळी) यांच्याविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अधीक तपास पोलिस उपनिरीक्षक कांदे करीत आहेत.

# फक्त 'या' ३ कारणांसाठी बाबा सिद्दीकींना संपवलं, मुंबई पोलिसांचा खळबळजनक दावा



मुंबई, (दिव्य न्युज):- राज्याचे माजी मंत्री, काँग्रेसचे माजी आमदार आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणाने एकच खळबळ उडाली होती. सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर रोजी हत्या करण्यात आली होती. या हत्या प्रकरणी लॉरेन्स बिष्णोई गँगमधील मारेकऱ्यांना अटक करण्यात आली आहे. बाबा सिद्दीकी यांची बिष्णोई गँगने हत्या ३ कारणांसाठी करण्यात आल्याचा दावा मुंबई पोलिसांनी केला आहे.

बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात मुंबई पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले आहे. हे आरोपपत्र ४५९० पानांचे आहे. मुंबई पोलिसांनी एकूण २६ आरोपींविरोधात हे आरोपपत्र दाखल केले आहे. या प्रकरणी ३ आरोपी फरार आहेत. यामध्ये अनमोल बिष्णोईचेही नाव आहे. मुंबई पोलिसांनी २१० जणांच्या साक्षी नोंदवल्या आहेत. बाबा सिद्दीकी हत्याकांड प्रकरणाच्या आरोपपत्रात मुंबई पोलिसांनी हत्येचे कारणही नमूद केले आहे.

माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर रोजी गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. सिद्दीकी यांचे पुत्र आणि तत्कालीन आमदार झिशान सिद्दीकी यांच्या वांद्रे पूर्वेतील कार्यालयाबाहेरच हा गोळीबार झाला होता. रात्री नऊच्या आसपास बाबा सिद्दीकी कार्यालयातील कामकाज उरकून आपल्या घराकडे निघाले होते. त्यावेळी कार्यालयाबाहेर दबा धरून बसलेल्या तीन जणांनी सिद्दीकी यांच्यावर गोळीबार केला. दसऱ्याच्या दिवशी ही हत्या करण्यात आली. दुर्गा विसर्जन मिरवणुकीच्या गर्दीचा फायदा घेत मारेकऱ्यांनी पसार होण्याचा प्रयत्न केला होता. सिद्दीकी यांची हत्या वांद्रे पूर्वेतील एका एसआरए प्रकल्पाच्या वादातून झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत होता. त्याशिवाय, राजकीय असूयेतून ही हत्या झाली का, अशीही चर्चा सुरू झाली होती.

मुंबई पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रात बाबा सिद्दीकींच्या हत्येचे कारण सांगितले आहे. बाबा सिद्दीकींची हत्या करण्यासाठी बिष्णोई गँगकडे तीन प्रमुख कारणे होती. यामध्ये अभिनेता सलमान खानसोबतची जवळीक हे प्रमुख कारण होते. तर, दुसरं कारण हे कोठडीत आत्महत्या केलेल्या अनुज थापनचा बदला घेणे आणि तिसरं कारण म्हणजे बिष्णोई गँगची दहशत प्रस्थापित करण्यासाठी सिद्दीकींची हत्या करण्यात आल्याचे पोलिसांनी म्हटले. पोलिसांनी या प्रकरणी आरोपी शुभम लोणकरच्या फेसबुक पोस्टचा दाखला दिला आहे.

## मारहाणीत वापरलेले गॅस पाईप, लोखंडी वायर, फायटर पोलिसांकडून जप्त

बीड , (दिव्य न्युज):- सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकणातील आता जवळपास सर्व आरोपींना अटक झाली आहे. त्यासोबतच संतोष देशमुख यांच्या हत्येत वापरण्यात आलेल्या वास्तूही पोलीसांनी जप्त केल्या असल्याची माहिती आहे. ३५ फुट गॅस सिलिंडर पाईप, लोखंडी वायर, लोखंडी फायटर आणि लाकडी रॉडने संतोष देशमुख यांना मारहाण झाली असल्याची माहिती होती, हे सर्व शस्त्र जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्याकांडात आणि अपहरणानंतर देशमुखांना अमानुष मारहाण झाली, त्यात या शस्त्रांचा वापर झाल्याची माहिती आहे.

संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी अपहरण करुन हत्या करण्यात आली होती. हल्लेखोरांनी हत्येसाठी धारदार शस्त्र, तलवारीसारखे शस्त्र, धारदार चाकू, लोखंडी वायर आणि लोखंडी फायटरचा वापर केला असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी म्हटले आहे. पोस्टमॉर्टम अहवालानुसार संतोष देशमुख यांच्या शरीरावर ५६ वार होते. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार संतोष देशमुख यांना मारहाण केली तेव्हा त्याचा व्हिडिओ तयार करण्यात आला. तो व्हिडिओ मिळवण्यात आले आहे. व्हिडिओ कोणाला पाठवण्यात आला याचा तपास पोलीस करत आहेत.

पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, गॅस सिलिंडर पाईप तसेच लोखंडी वायरवर जप्त करण्यात आले आहे. यावर रक्ताचे डाग सापडले आहेत. यासह पोलीसांनी लोखंडी फायटर, लाकडी रॉड, जप्त केले आहे. या शस्त्रांचा वापर संतोष देशमुख यांना अमानुष मारहाणीसाठी करण्यात आला. पोलीसांनी या शस्त्रांसोबतच सहा वाहनांचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, दोन ते तीन मोबाईल फोन आणि एटीएम कार्ड जप्त करण्यात आले आहे.पोलिस सूत्रांनी सांगितले की, आरोपींच्या मोबाईल फोनमधून अमानुष मारहणाचा व्हिडिओ मिळवण्यात आला आहे. अतिशय अमानुष मारहाण संतोष देशमुख यांना करण्यात आली. पोस्टमॉर्टम अहवालानुसार संतोष देशमुख यांना शरीरावर एकाच ठिकाणी अनेक वेळा वार करण्यात आले. अतिशय निर्दपणे मारण्यात करण्यात आली.पोलिस आणि सीआयडीने आतापर्यंत सात आरोपींना अटक केली आहे. त्यांच्यावर अनेक गंभीर गुन्हे याआधीही दाखल आहेत. आरोपींचा पूर्वेतिहास हा गुन्हेगारी असल्याचे समोर आले आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सुदर्शन घुले याला पुण्यातून अटक केली आहे. त्याच्यावर दहा हून अधिक गंभीर गुन्हे आहेत. त्यात हत्या, खंडणी, अपहरण, दंगल, यासारखे गंभीर गुन्हे आहेत.

आरोपी प्रतिक घुले, कृष्णा आंधळे, महेश केदार या तिघांवरही संतोष देशमुख यांच्या हत्येसह आणखी पाच गंभीर गुन्हे आधीच दाखल आहेत. यामध्ये हत्या, खंडणी, अपहरण यासारखे गुन्हे आहेत. याशिवाय जयराम माणिक चाटे, सुधीर सांगळे आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून निलंबित करण्यात आलेला विष्णू चाटे यांच्यावरही अशाच प्रकारचे गुन्हे आहेत. अपहरण आणि हत्येचे गुन्हे त्यांच्यावर दाखल आहेत.संतोष देशमुख हत्येतील मास्टरमाईंड वाल्मिक कराड हा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे. वाल्मिक कराडवर हत्या, खंडणी, अपहरणसारखे १५ हून अधिक गुन्हे दाखल आहेत.

## सुदर्शन घुले अन् सुधीर सांगळेच्या मागील १० वर्षाच्या गुन्ह्यांची यादी समोर!

बीड , (दिव्य न्युज):- जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण प्रचंड गाजलं आहे. कारण या घटने मागे वाल्मिक कराड कनेक्शन असल्याची माहिती मिळाली आहे. अशातच आज या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुलेला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. मात्र या प्रकरणातील सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे हे नेमके कोण आहेत? तसेच त्यांच्यावर आतापर्यंत कोणते गुन्हे दाखल आहेत? यासंदर्भात माहिती मिळाली आहे.



सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मिक कराड हा ३१ डिसेंबर २०२४ ला पोलिसांना शरण आला होता. त्यानंतर त्याला केज न्यायालयाने १५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. अशातच आता या घटनेतील तीन पैकी दोन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.याशिवाय मुख्य आरोपी सुदर्शन घुले याला पोलिसांनी अटक देखील केली आहे. तर सिद्धार्थ सोनवणेला देखील मुंबईतून ताब्यात घेतलं असल्याची माहिती मिळाली आहे. तसेच सरपंच संतोष देशमुख यांचं लोकेशन देणारा आणखी डॉक्टरला देखील पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलं. त्यामुळे आता या सर्वांची पोलिसांकडून कसून चौकशी सुरू आहे.सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुलेचं वय हे २६ वर्ष आहे. सुदर्शन घुलेवर मागील १० वर्षांत तब्बल १० गुन्हे दाखल झाले आहेत. यामध्ये मारहाण, अपहरण, चोरी, खंडणी आणि खुनाचा प्रयत्न तसेच फूस लावून पळवून नेल्याचे गुन्हे दाखल आहेत. अशातच आता सरपंच हत्या प्रकरणी देखील त्याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.दरम्यान, सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील दुसरा आरोपी सुधीर सांगळे हा आहे. सुधीर सांगळेच वय हे २२ वर्ष आहे. तसेच आता आरोपी सांगळेवर खुनातील सहभागाचा गुन्हा दाखल करण्यात आला. कारण आवादा कंपनीकडे दोन कोटींची खंडणी मागितल्या प्रकरणी त्याच्यावर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## माजलगाव तालुक्यात घरकुल योजनेचा बट्ट्याबोळ

## गटविकास अधिकारी, घरकुल अभियंता, संगणक परिचालकाची चौकशी करून बडतर्फ करण्याची मागणी




माजलगाव, (दिव्य न्युज):- घरकुल योजना ही शासनाची महत्वकांक्षी योजना असून या योजनेत अधिकारी व कर्मचारी खोडा घालत लाभार्थ्यांना घरकुलापासून वंचित ठेवत आहेत. त्यामुळे पंचायत समिती माजलगाव येथील संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून बडतर्फ करणे याबाबत निवेदन देण्यात आले आहे.

याबाबत निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, माजलगाव पंचायत समिती घरकुल विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यावर गटविकास अधिकारी घरकुल सारख्या महत्त्वकांविषयी योजनेत खोडा घालून बदनाम करण्याचे काम अनेक दिवसापासून बिनबोभाट सुरू आहे. लाभार्थ्यांना घरकुल रेखांकन दिल्यानंतर ६/६ महिने घरकुल अभियंता लाभार्थ्याकडे फिरकत नाही. लाभार्थ्यांना जरी भेटी दिल्या तरी त्यांच्याकडून चिरीमिरी घेतल्याशिवाय हप्ते टाकले जात नाहीत. माजलगाव तालुक्यात आज ही हजारो लाभार्थी हक्काच्या घरकुलापासून वंचित राहत आहेत. पात्रुड सर्कल मधील प्रत्येक गावातील लाभार्थी वर्गात प्रचंड असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. ज्या लाभार्थ्यांनी घरकुल अभियंत्यांना लक्ष्मी दर्शन न दिल्यास सध्या बजेट नाही म्हणून वेळ निभावून नेतात. सर्वसाधारणपणे दीड लाखाच्या रकमेत प्रत्यक्षात घरकुल अभियंता, विस्तार अधिकारी, ऑपरेटर यांना पैसे वाटप करून प्रत्यक्षात एक लाख रुपये शिल्लक राहतात. त्यातून घर कसे बांधायचे असा प्रश्न निर्माण झाल्याने घर बांधणीची लाभार्थ्यांची इच्छा राहत नाही लाभ देत असताना अभियंत्याकडून पात्र, गरजू लाभार्थ्यांना वंचित ठेवण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणावर झाला असल्याचे स्पष्ट होते. ऑपरेटर मगरेची झुंडशाही/हुकूमशाही माजलगाव पंचायत समितीची इज्जत वेशीला टांगणाऱ्या घरकुल ऑपरेटर मगरेची प्रचंड हुकूमशाही वाढली असून लाभार्थ्याकडून पैसे घेतल्याशिवाय कोणाचेच हप्ते काढले जात नाहीत. गेल्या तब्बल १५ वर्षाहून अधिक काळापासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसल्याने त्यांची हिंमत बिनदिक्कतपणे वाढली आहे. गटविकास अधिकारी माजलगाव या मगरेच्या काळ्या कारनाम्याला पाठीशी घालत असल्याने त्याची हिंमत वाढत चालली आहे त्यामुळे लाभार्थ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. माझे कोणीच वाकडे करू शकत नाही कोणी कमी जास्त केले तर खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देतो. तरी या तक्रारीची गंभीर दखल घेऊन संबंधिताची सखोल चौकशी करून त्यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात यावे नसता आम्ही सर्वजण दि.२३/१/२३ रोजी जिल्हा कार्यालया समोर बेमुदत आमरण उपोषणास बसू असे निवेदन नईम आतार, सोमेश्वर सोनटक्के, पृथ्वीराज निर्मळ, बालाप्रसाद जाजू यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जि. प. बीड यांना दिले आहे.

पान १ वरून

### शिवशाही धावणार

झाल्याच्या तक्रारी वाढल्या. बसमधील एसी बंद, सीट कव्हर आणि धुळीने माखलेले पडदे, बसमधील अस्वच्छतेमुळे प्रवाशांची गैरसोय होत होती. वातानुकूलित बसेसमुळे नागरिकांकडून जास्त पैसे घेऊनही त्यांना समाधानकारक सुविधा दिल्या जात नसल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. तसेच या बसेसच्या वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यात शिवशाही बसेसच्या तपासणीचे निर्देश देण्यात आले. तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर या बसेस सुरू ठेवण्याबाबत किंवा उपायांबाबत विचार केला जाणार आहे.

### ससेवाडी फाट्यावर ट्रकने

रुग्णालयात नेण्यात आला. तर ट्रकचालक अनिकेत चाटे (वय २० रा. साकुड, ता. अंबाजोगाई, जि.बीड) त्याला नेकनूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणी सावंत यांच्या नातेवाइकांच्या तक्रारीवरून नेकनूर पोलिस ठाण्यात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### व्हायरसमुळे घाबरुन जाऊ

आरोग्य मंत्रालयाने नेमकं काय म्हटलं आहे? भारतातील या व्हायरससंबंधी परिस्थितीबद्दल माहिती देताना केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने निवेदन जारी केले आहे. ज्यामध्ये एचएमपीव्ही भारतासह जागतिक स्तरावर आधीपासूनच प्रसारित झाला आहे आणि विविध देशांमध्ये एचएमपीव्हीशी संबंधित श्वसन आजारांची प्रकरणे नोंदवली गेली आहेत अशी माहिती देण्यात आली आहे. या संक्रमणावर लक्ष ठेवले जात असताना भारतातही याची दोन प्रकरणे आढळून आली आहेत.

### अजब कारभार ; काम न

जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले १) संबंधित गुत्तेदार यांच्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. २) ज्या संस्थेवर काम करण्यात आलेले आहे ती संस्था ब्लॅक लिस्ट करून त्या संस्थेकडून या बीलाची रिकव्हरी करण्यात यावी. ३) अभियंता भागवत व उपविभागीय अभियंता बोराडे यांना बडतर्फ करण्यात यावे. यासंबंधी प्रशासनानी दखल घेऊन कार्यवाही न केल्यास बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल याची प्रशासनाने दखल घ्यावी.

### संचालक माहिती कार्यालयात

त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी संचालक (माहिती) कार्यालयातील कर्मचारी प्रविण भानेगावकर, संजय परदेशी, राजेंद्र वाणी, प्रकाश राऊत, प्रतिक्षा शेजूळ, दशरथ वानोळे, इंदुबाई गावंडे, पांडुरंग जाधव, राहुल तोणगिरे, शेख अब्दुल रहेमान, अनिल बिरोटे, अशोक सुरडकर, गणेश सुरासे यांनीही बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.

## 'बीडमध्ये संविधान बचाओ' जनआक्रोश मोर्चा परभणीच्या घटनेचा जाहीर निषेध

बीड (दिव्य न्युज):- परभणी येथील शहीद भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांचा संशयास्पद मृत्यू असून दोषींविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी यासह इतर मागण्यांसाठी आज बीड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी रस्त्यावर उतरले. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून संविधान बचाओ जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर दुपारी धडकला. या मोर्चात हजारो आंबेडकर अनुयायी सहभागी झाले होते.परभणी येथे जाणीवपुर्वक संविधान प्रतिमेची केलेली विटंबना यासह शहीद भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांचा झालेला संशयास्पद मृत्यू तसेच देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी केलेले गैरवक्तव्ये केज तालुक्यातील मस्साजोग येथील संतोष देशमुख यांची झालेली निर्घृण हत्या या सर्व घटनांचा जाहीर निषेध करण्यासाठी आज बीह येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर संविधान बचाओ जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून निघाला होता. मोर्चामध्ये हजारो अनुयायांची उपस्थिती होती.

पान १ वरून

### सीआयडीच्या मोठ्या

आरोपींना अटक केली जाते.

मात्र तरीसुद्धा आरोपीमध्ये सुधारणा न झाल्यास त्यावर तडीपारीची कारवाई करण्यात येते. यानंतरही आरोपीमध्ये जर सुधारणाझाली नाही तर त्यांच्यावर पोलीसांना मोक्का अंतर्गत कारावाई करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. त्यामुळे आता वाल्मिक कराडसह इतर आरोपींवर मोक्का लागण्याची शक्यता आहे.

सर्वात महत्वाचं म्हणजे मोक्का लागल्यास आरोपीला अटकपूर्व जामीन मिळवता येत नाही. तसेच भारतीय दंड विदान संहीतेच्या लावलेल्या कलमांखाली जेवढी शिक्षा असेल तीच शिक्षा मोक्काच्या कलम ३ (१) नुसार देता येईल. तसेच ही शिक्षा किमान ५ वर्षे ते जन्मठेपेपर्यंत देखील राहते.

याशिवाय आरोपींवर मोक्का लावल्यास किमान दंड हा पाच लाखांपर्यांतचा असतो. तसेच आरोपींची मालमत्ता जप्त करण्याची देखील तरतूद या कायद्यात आहे.याशिवाय संघटीत गुन्हेगारी करुन जर आर्थिक फायदा घेतला जात असेल किंवा टोळी तयार करुन जर गुन्हेगरी करत असाल तर त्या संदर्भात मोक्काची तरतूद ही केली आहे.

### संतोष देशमुख

महेश केदार, प्रतीक घुले व विष्णू चाटे यांना अटक केली. मात्र या प्रकरणातील तीन आरोपी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे आणि कृष्णा आंधळे हे फरार होते, घटनेला २२ दिवस उलटले तरी देखील ते पोलीस आणि सीआयडीच्या हाती लागत नव्हते. दबाव वाढत होता, अखेर सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना पुण्यातून अटक करण्यात आलं आहे. तर याच दिवशी त्यांना मदत करणाऱ्या आणखी एकाला मुंबईतून अटक करण्यात आलं. मात्र अजूनही या प्रकरणातील एक आरोपी कृष्णा आंधळे हा फरार आहे. त्याचा शोध शुरू आहे.

या प्रकरणात वाल्मिक कराड याच्यावर देखील आरोप करण्यात येत होता. पुण्यातून या आरोपींना अटक करण्यापूर्वीच तो सीआयडीला शरण आला. दरम्यान या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना कोर्टानं १८ जानेवारीपर्यंत सीआयडी कोठडी सुनावली आहे.

३३३३ कनेक्शन अन् सुदर्शन घुले

समोर येत असलेल्या माहितीप्रमाणे सुदर्शन घुलेची आधीपासूनच त्याच्या गावासह तालुक्यात दहशत होती. तो ३३३३ हा नंबर लकी मानायचा, सुधीर सांगळे याच्यासह त्याची जी गँग होती तीचं नाव देखील ३३३३ च होतं. एवढंच नाही तर घुलेने संतोष देशमुख यांच्या अपहरणासाठी जी गाडी वापरली होती, त्याच्या त्या गाडीचा नंबर देखील ३३३३ च होता.

### एसआयटी पथकातून तीन

नाहीत, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. या संदर्भात अधिकृत माहिती समोर आली नसली तरी याची समाज माध्यमावर चर्चा होत आहे..

मस्साजोग सरंपच हत्या, खंडणी व मारहाण प्रकरणाचा तपास सध्या सीआयडी करत आहे. सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उपमहानिरीक्षक बसवराज तेली यांच्या नेतृत्वात एसआयटी नियुक्त केली. यात स्थानिक गुन्हे शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक विजयसिंह झोनवाल, पोलिस उपनिरीक्षक महेश विघ्ने, सहायक फौजदार तुळशीराम जगताप, हवालदार मनोज वाघ यांचाही समावेश होता. महेश विघ्नेसह काही कर्मचाऱ्यांचे कराड सोबत फोटो व्हायरल झाले होते. त्यांनतर राजकीय नेत्यांनी आक्षेप घेतला होता. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षकांनी या वादग्रस्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना स्थानिक गुन्हे शाखेमधून कार्यमुक्त केले नाही. त्यामुळे त्यांची नियुक्ती एसआयटीकडे वर्ग झाली नाही. परिणामी एसआयटीमध्ये रुजू होण्याआधीच त्यांची हकालपट्टी करण्यात आल्याची माहिती आहे.

### धनंजय मुंडेसाठी

बोलणार आहेत असे नाईकवाडे म्हणाले.

आ. धस गुंडगिरीवर बोलतात पण पुण्यातील गुंड निलेश घायवाळ सोबत सुरेश धस काय करित आहेत? खंडणी प्रकरणात सुरेश धसांनी ज्याचा उल्लेख केला तो नितीन विक्कड हा सुरेश धसांचा माणूस आहे, याचही सुरेश धसांनी उत्तर द्यावं असे नाईकवाडे म्हणाले. जरांगेंनाही केली विनंती पत्रकार परिषदेतून अविनाश नाईकवाडे यांनी मनोज जरांगे यांनाही विनंती केली. मनोज जरांगे आमच्यासाठी दैवत, आजपर्यंत स्टेजवर एकटे बोलायचे, आज काय वेळ आली? तुमचे व्हिडिओ दाखविणारा मी आहे. तुमच्यासाठी फुलं वेचणारा मी आहे. पण तुमच्या तोंडातून हिंसेची भाषा योग्य नाही. मराठा समाजाला हिंसेकडे नेऊ नका असे नाईकवाडे म्हणाले.

### कैलास फड सह

प्रकरणातील जिल्हाभरातील सर्व परवाने तपासणीचे काम प्रशासनाने हाती घेतलेले आहे. परळीतील कैलास फड याने पिस्टल दाखवून त्याचा व्हिडीओ व्हायरल केला होता. यामध्ये त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाल्यानंतर आता प्रशासनाने कैलास फड याच्यासह माणिक फड आणि बाळासाहेब सोनवणे यांचेही पिस्टलचे लायसन रद्द केले आहे.